# ॥ हरिपाठ ॥



सद्गुरू चंद्रकांत अनंत भोसेकर
आणि गुरूवर्य श्री. दिवाकर अनंत घैसास

# प्रस्तावना

## "श्रीराम"

**सद्गुरू चंद्रकांत अनंत भोसेकर** यांचे अखेरचे लिखाण म्हणजे हरिपाठाच्या अभंगाचा अर्थ. एकूण २९ अभंगापैकी २० अभंगाचा अर्थ लिहून झाला होता आणि सद्गुरूंना देहमुक्त व्हावं लागलं.

सद्गुरूंचं हे अपुरं कार्य पूर्ण होऊ शकलं तर आपणा सर्वांनाच त्याचा फायदा होईल या विचारानी कुणातरी ज्येष्ठ व्यक्तीला उर्वरीत ९ अभंगांचा अर्थ लिहीण्याची विनंती करावी असा विचार आला. सहजच गुरूवर्यांचे मित्र **गुरूवर्य श्री. दिवाकर घैसास** यांचे नांव डोळयासमोर आले. त्यांना विनंती करताच त्यानी ते कार्य पूर्ण करण्याचे आनंदाने मान्य केले व काही दिवसातच २१ ते २९ या ज्ञानेश्वरांच्या अभंगांचे व तिसावा अभंग तुकाराम महाराजांचा, त्यावरही त्यांचे भाष्य त्यांनी लिहूनही दिले.

आज १३ जानेवारी २००७. सद्गुरूना देहबंधनातून मुक्त होऊन बरोबर एक वर्ष झालं. म्हणजेच आजचा तीनशे पासष्ठावा स्मृतीदिन. ज्यांची वर्षातून एकदाच आठवण येते त्यांचा वार्षिक स्मृतीदिन म्हणता येईल. पण ज्यांची रोजच आठवण येते नव्हे क्षणोक्षणी आठवण येते अशा आपल्या **सद्गुरूंचा आजचा तीनशे पासष्ठावा स्मृतीदिन**. त्यानिमित्त त्यांनी आपल्याकडून हे त्यांचे अपूर्ण राहिलेले कार्य पूर्ण करून घेतलं, यासारखी भाग्याची गोष्ट आपल्या नशिबी आणखी काय असणार? अर्थात् हे सर्व ईश्वरीइच्छा आणि सद्गुरू कृपेशिवाय होऊच शकत नाही हेच खरं.

हे कार्य सिध्दीस नेण्यास हातभार लावणा-या सर्वांचे व आदरणीय श्री. दिवाकर घैसास यांचे विशेष आभार मानतो.

आपणा सर्वांवर सद्गुरूंची सदैव कृपा राहो ही त्यांच्या चरणी प्रार्थना करतो.

आपला

**धनंजय चंद्रकांत भोसेकर**

## सोमवार - १

देवाचिये द्वारीं उभा क्षणभरीं | तेणें मुक्ति चारी साधियेल्या ||१||
हरि मुखें म्हणा, हरि मुखें म्हणा | पुण्याची गणना कोण करी ||२||
असोनी संसारीं जिव्हे वेगु करी | वेदशास्त्र उभारी बाह्या सदा ||३||
ज्ञानदेव म्हणे व्यासाचिया खुणें | द्वारकेचे राणे पांडवां घरीं ||४||

**विवरण -** येथे ज्ञानेश्वर माऊलीने देवाचिये द्वारी असं म्हटलं आहे. देवळाचिये द्वारी असं म्हटलं नाही. देवळाच्या दारातून मूर्तीकडे पोहोचता येतं. तसं देवाकडे पोहोचण्याचं दार म्हणजे आपलं मन. या मनाच्या दारातून 'उभा क्षण' म्हणजे संपूर्ण क्षण म्हणजेच प्रत्येक क्षणी एक क्षण आपण अंर्तमुख झालो तर आपल्याला ईश्वरदर्शन करून देणा-या चारी मुक्ती लाभतात. सलोकता, समीपता, स्वरूपता, सायुज्यता या चार मुक्ती आहेत. प्रभूच्या साम्राज्यात प्रवेश झाला की सलोकता, त्याचं सतत मनात सान्निध्य लाभलं की समीपता, भगवंतासारखं रूप झालं की सरूपता आणि ईश्वरात पूर्णपणे विलीन झालं की सायुज्यता. या चारी मुक्तींचा लाभ होतो. मग मन अंतर्मुख करून मुखाने हरीचे मनापासून नांव घेतलं की जे पुण्य मिळतं त्याची मोजदाद कोणालाही करता येत नाही. या संसारात नको म्हटलं तरी रहावं लागतं. संसारात राहून पुण्य मिळवण्याचे दोन मार्ग आहेत. एक दुस-याला सुख देण्याचं सत्कर्म करून आणि दुसरा ईश्वराचं नामस्मरण अखंडपणे करून अमाप पुण्य मिळवता येतं. पण त्यासाठी जिभेला श्रीहरीच्या नामाच्या उच्चाराचं वळण लागावयास पाहिजे. तेही गणितश्रेणीने वाढावयास पाहिजे. म्हणजे केव्हातरी नाम घेतो इथपासून अखंड नाम घेतो इथपर्यंत प्रगति झाली पाहिजे. ही नामस्मरणाची पवित्र सवय आपल्याला लागली की आपण शुध्द व पवित्र होऊन जाऊ. चार वेदानी आणि सहा शास्त्रानी बाह्या उभारून व हात वर करून हेच सांगितलं आहे, की हे जीवा, तू अखंड नामस्मरण करीत रहा. आज ना उद्या तुला देव भेटेलच भेटेल. भगवान श्रीकृष्ण हे देवकीच्या उदरी मथुरेत जन्माला आले व गोकुळात यशोदेच्या पदरी लहानाचे मोठे झाले. नंतर त्यांनी द्वारकेसारखं संपन्न साम्राज्य उभारलं पण शेवटी हा द्वारकेचा राणा पांडवांच्या घरी सतत या ना त्या कारणाने राबला. इतकंच नव्हे तर धर्मराजाच्या अश्वमेध यज्ञाच्या वेळी त्याने उष्टीखरकटी सुध्दा काढली आणि भारतीय युध्दांत अर्जुनाला संकटाच्यावेळी सतत मदत केली व देवपणाचं ब्रीद राखलं.

000000000

**चहूं वेदीं जाण षट्शास्त्री कारण | अठराही पुराणें हरीसी गाती |**
**मंथुनी नवनीता तैसें घे अनंता | वायां व्यर्थ कथा सांडी मार्ग |**
**एक हरि आत्मा जीवशिव सम | वायां तूं दुर्गमीं न घालीं मन |**
**ज्ञानदेवा पाठ हरि हा वैकुंठ | भरला घनदाट हरि दिसे ||**

**विवरण -** यश, श्री, औदार्य, ज्ञान, वैराग्य आणि ऐश्वर्य हे सहा गुण श्रीहरिचे आहेत. अशा या श्रीहरीचे गुणगान चार वेद, सहा शास्त्रे व अठरा पुराणे अखंडपणे करत असतात. तुकाराम महाराज म्हणतात, **'वेद अनंत बोलिला | अर्थ इतुकाचि साधला || निजनिष्ठे नाम गावे | विठोबासी शरण जावे' ||** चार वेद, सहा शास्त्र आणि अठरा पुराणं ही सर्व शिकणं मानव बुध्दीला एका आयुष्यात शक्यच नाही. आणि या सर्वांना पडताळून पहाण्यास एक आयुष्य पुरणार नाही. म्हणून आपल्या संतांनी या सा-या पसा-यातून नेमकं सार शोधलं आणि ते आपल्या हातात दिलं आहे. उदा. आपण दुधाला विरजण लावतो, त्याचं दही होतं, मग रवीने त्या दह्याचं मंथन करून त्यातलं सार जे लोणी ते वर काढतो व असार असणारं ताक खाली रहातं. तसं मानवाला बुध्दीचं वरदान मिळालं आहे. वेद, शास्त्र, पुराणं याचं दुध ऋषि, मुनींनी दिलं आहे. हे दूध वैराग्याच्या अग्नीने तापवून त्यात श्रध्देचं विरजण घालायचं आणि मग तयार झालेल्या दह्याचं सारासार विवेकाने घुसळण करायचं. मग त्यातलं नवनीत म्हणजे ईश्वराचं नाम आपल्या हाती येतं. हे समजावून सांगण्यासाठी अनेक दृष्टांतांचा, कथांचा आधार घेतला जातो. पण ब-याच वेळा या दृष्टांतातच आपण अडकून बसतो. म्हणून या असार कथा बाजूला साराव्या आणि सार जे अनंताचं नाम तेवढं घ्यावं. श्रीहरि या मानवी शरीरात आत्मस्वरूपाने भरलेला आहे. पण अविद्येमुळे या आत्म्याला जीव म्हणून संबोधलं जातं. तसंच ही परमात्मसत्ता विश्वाच्या कणांकणांतं सामावलेली आहे. तसंच जीव व शिव हे सारखेच आहेत. हे जीवा तू एवढं समजावून घे आणि इतर अगम्य व दुर्गम गोष्टीत तू आपलं मन घालू नकोस. जिथे श्रीहरीचं नाम आहे तिथेच वैकुंठ आहे. हे विश्व म्हणजे श्रीहरीच्या शक्तीचं वेगवेगळया माध्यमातून होणारं प्रकटीकरण आहे. म्हणून या विश्वात श्रीहरी घनदाट भरून राहिला आहे असा ज्ञानेश्वर माऊलीने आपल्याला पाठ दिला आहे. या विश्वात अशी जागा नाही जिथे श्रीहरीचं वास्तव्य नाही. पण यासाठी अनादि असलेली अशी अविद्या नष्ट व्हायला पाहिजे. मग अज्ञानाचा पडदा गळून पडतो आणि सर्वत्र श्रीहरीचं दर्शन घडतं.

000000000

# बुधवार - ३

**त्रिगुण असार निर्गुण हें सार | सारासार विचार हरिपाठ ||१||**
**सगुण निर्गुण गुणाचें अगुण | हरीविणें मन व्यर्थ जाय ||२||**
**अव्यक्त निराकार नाहीं ज्या आकार | जेथोनि चराचर हरिसी भजें ||३||**
**ज्ञानदेवा ध्यानीं रामकृष्ण मनीं | अनंत जन्मांनी पुण्य होय ||४||**

**विवरण -** त्रिगुणात्मक प्रकृति व तिने निर्माण केलेले हे त्रिगुणात्मक जग हे सार आहे की असार आहे किंवा त्या जगाचे अधिष्ठान असलेले निर्गुण परब्रम्ह हेच सार आहे. हे जीवा, या सर्व गोष्टींचा तू विचार करत बसू नको. कारण या सर्व गोष्टींचा विचार करूनच ज्ञानेश्वर माऊलीने तुला हा हरिपाठाचा व त्यातील हरिनामाचा अमूल्य ठेवा दिला आहे. सगुण श्रेष्ठ की निर्गुण श्रेष्ठ या विचारात साधकाला अमूल्य वेळ खर्च करण्याचं काहीच कारण नाही. कारण या संबंधीचे निर्णय बुध्दीच्या पलीकडे जाऊन अनुभवानेच घ्यायचे असतात. सगुण न निर्गुणाचे गुण हे कल्पनेनेच निर्माण होतात. पण श्रीहरीला कोणतेच गुण चिकटवता येत नाहीत, म्हणून तो अगुण आहे. या हरीच्या ठिकाणी प्रवेश व्हायला हवा मनाचा, तो झाला नाही तर सर्व व्यर्थ होतं. इतर कोणत्याही ठिकाणी मन रमलं तरी ते श्रम फुकट जातात. मुळात जसा अज्ञात आणि निराकार असणारा आत्मा देहरूपाने साकार झाला तसा निर्गुण, निराकार, अव्यक्त, अगोचर असणारा परमात्मा दृश्य, चराचर सृष्टीच्या रूपाने साकारला. त्या आकार असलेल्या पडद्याच्या मागे असलेल्या श्रीहरीचे भजन कर. हे चराचर विश्व व्यक्त आहे पण ते जेथून उदयाला येतं ते तत्व अव्यक्त आहे, निराकार आहे. याचा अर्थ असा की परब्रम्ह तत्वाला विशिष्ठ असा आकार नाही. तरीपण नानाप्रकारचे आकार धारण करण्याचे सामर्थ्य त्याच्या ठिकाणी आहे. तेव्हा विश्वरूपाने तोच नटलेला आहे हे लक्षात ठेवून तू त्याचं नामस्मरण कर. अनंत जन्माचं पुण्य फळाला आलं की ध्यानी मनी ईश्वर येतो. त्यांचे अवतार राम, कृष्ण, वगैरे येतात. ही स्थिती याच जन्मात **'याचि देही याचि डोळा'** प्राप्त करून घेण्याची सुरेख सोय ज्ञानेश्वरमाऊलीने आपल्यासाठी करून ठेवली आहे. ही सोय म्हणजे अखंड हरिनाम घेणं. या नामोच्चाराने ध्यानी, मनी भगवंत येऊ शकतो. म्हणून माऊली सर्वांना प्रेमाने उपदेश करत आहे की,

**"हरिमुखें म्हणा, हरिमुखें म्हणा | पुण्याची गणना कोण करी ||**

**0000000**

## गुरूवार - ४

**भावेंवीण भक्ति भक्तिवीण मुक्ति | बळेंवीण शक्ति बोलूं नये ||१||**
**कैसेनि दैवत प्रसन्न त्वरित | उगा राहं निवांत शिणसी वायां ||२||**
**सायासें करिसी प्रपंच दिननिशीं | हरिसी न भजसी कोण्या गुणें ||३||**
**ज्ञानदेव म्हणे हरिजप करणें | तुटेल धरणें प्रपंचाचें ||४||**

**विवरण** - भक्ती म्हणजे मानसिक स्तरावर संपूर्ण समरसता. ही समरसता साधली जाते अतिप्रेमाने, आवडीने, भावाने. जिथे भाव आहे तिथे प्रेम आहे. ही आसक्ति विषयांच्या पातळीवर सर्वच जीव अनुभवत असतात. पण ही आसक्ति विषयांचं आणि इंद्रियांचं मीलन झालं की कमी कमी होत जाते. एक क्षण तृप्तीचा आला की मन माघारी फिरतं. या अनुभवाच्या अगदी उलट स्थिती भक्तीच्या द्वारातून भक्त उपभोगत असतो. तो नाही भेटला तरी त्याच्या प्रतिक्षेतसुध्दा आनंद आहे आणि ही भक्ति असल्याशिवाय संसारातून मुक्ति मिळत नाही व अंगात बळ असल्याशिवाय प्रचंड शक्तीच्या गोष्टी बोलून उपयोग काय?

भक्ति म्हणजे प्रयास नाही तर प्रसाद आहे. भक्ति म्हणजे सायास नाही तर सहजता आहे. प्रपंचात वस्तू प्रयत्न करूनच मिळतात. तर पारमार्थिक लाभ हा प्रसादाने प्राप्त होत असतो. प्रभू प्रसन्न होण्यासाठी शुध्द भावानं निवांत रहावं लागतं. परमार्थात स्वत:च्या प्रयत्नाने काहीही होत नाही. उगाच शीण म्हणजे थकवा मात्र पदरी पडतो. जे होत असतं ते त्याच्या संकल्पाने व कृपेनेचं होत असतं. तुकाराममहाराज म्हणतात, **'बैसोनि निवांत शुध्द करी चित्त'| तया सुखा अंत पार नाही ||** प्रपंचातील गोष्टी मिळवण्यासाठी आपण रात्रंदिवस बैलासारखे राबत असतो. पण देवाचं नाम घ्यायला मात्र आपल्याला एक क्षणसुध्दा फुरसत नसते. पण आपण त्या श्रीहरीचं भजन का करीत नाही ? आपला कुठला दुर्गुण त्या श्रीहरिचं भजन करण्याच्या आड येत असतो. कर्जदाराला दिलेलं कर्ज व्याजासहित वसूल करण्याची कुटिलता ज्याच्याकडे असते तोच सावकार होऊ शकतो आणि कोणताही प्रयत्न करून ही वसूली जर झाली नाही, तर शेवटचा उपाय म्हणून सावकार कर्जदाराच्या घरासमोर धरणं धरून बसून रहातो. त्याच प्रकारे प्रत्येकाच्या दारात प्रपंचाने जणू धरणं धरलं आहे. हे धरणं आसक्तीवर आधारलेलं असल्यामुळे ते काही केल्या सुटत नाही. हे सुटण्यासाठी खात्रीलायक उपाय अखंडपणें श्रीहरीचा नामजप करणे हा आहे. याने जीव प्रपंचाच्या धरण्यातून मुक्त होतो.

0000000

## शुक्रवार - ५

योगयागविधी येणें नोहे सिध्दी | वायांची उपाधि दंभधर्म |
भावेंवीण देव न कळे नि:संदेह | गुरूविण अनुभव कैसा कळे |
तपेविण दैवत दिधल्याविण प्राप्त | गुजेंविण हित कोण सांगे |
ज्ञानदेव सांगे दृष्टांताची मात | साधूंचे संगती तरणोपाय ||

**विवरण -** यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान, समाधी ही भगवान् पातंजलीनी सांगितलेली योगाची आठ अंगे आहेत. यांचा पायरीपायरीने अभ्यास करून समाधी साधणाऱ्या माणसाला योगी असं म्हणतात. पण योगी माणसाच्या वाटयाला कष्टच फार येतात. जसं दात नसणाऱ्या माणसाला लोखंडाचे चणे खायला दिले तर तो मरेल. जी अवस्था योगाची तीच यागाची म्हणजे यज्ञाची. ॲलोपॅथीत औषधावर, ते औषध वापरण्याची शेवटची तारीख असते. ती संपल्यावर ते औषध कितीही मौल्यवान असलं तरी ते फेकून द्यावं लागतं. तशी यज्ञ ही संस्था आजकाल कालबाह्य झाली आहे. शिवाय योग आणि यागाने परमात्मप्राप्ती दूरच, उलट नको ती उपाधी आणि दंभाचं जबरदस्त ओझं मात्र मानगुटीवर बसतं. मनात शुध्द भाव असल्याशिवाय देव कसा आहे याची निश्चितपणे खात्री पटणार कशी ? आणि समर्थ सद्‌गुरू असल्याशिवाय आपल्याला देवाच्या सामर्थ्याचा अनुभव येणार कसा ? तपश्चर्या हा भगवान पतंजलीनी सांगितलेल्या योगातील नियमांचा एक भाग आहे. (शौच, संतोष, तप, स्वाध्याय, ईश्वरप्रणिधानानि नियमा:|) व्यक्तिचा आंतरिक विकास होण्यासाठी कायेने, वाचेने व मनाने केलेले कष्ट म्हणजे तप. तप केल्याशिवाय आपलं इष्टदैवत कसं प्रसन्न होणार ? तसंच काहीतरी दिल्याशिवाय माणसाला इष्टवस्तूंची प्राप्ती होणार कशी ? आणि खरं प्रेम असल्याशिवाय माणूस माणसाला हिताच्या गोष्टी का सांगेल ? श्रीज्ञानेश्वरमाऊली म्हणते की मी माझ्या अनुभवाने तुम्हाला सांगत आहे की या संसारसागरातून तरून जायचं असेल तर साधूंच्या सत्संगतीशिवाय भक्ताला किंवा साधकाला तरणोपाय नाही. या अभंगाचं तात्पर्य असं की योग, याग इ. फक्त दंभ उत्पन्न करणारी साधनं साधकाने स्वीकारू नयेत. शुध्द भावाने व आत्मानुभवी समर्थ सदगुरूंच्या सहाय्याने आपल्याला देवाची प्राप्ती नि:संदेहपणे व निश्चितपणे होते.

000000

## शनिवार - ६

साधुबोध झाला तो नुरोनियां ठेला | ठायींच मुराला अनुभवें |
कापुराची वाती उजळली ज्योती | ठायींच समाप्त झाली जैसी |
मोक्षरेखें आला भाग्यें विनटला | साधूंचा अंकिला हरिभक्त |
ज्ञानदेवा गोडी संगती सज्जनी | हरि दिसे जनींवनी आत्मतत्त्वीं ||

विवरण - साधूंच्या, संतांच्या उपदेशाचा ज्याला बोध झाला तो संसारात न उरता रहातो. म्हणजे स्वत:च्या अधिष्ठानात मुरून जातो आणि आपल्या ठिकाणीच तो मुरून जातो असा त्याला अनुभव येतो. साधु उपदेश सर्वांनाच करतात पण त्या उपदेशाचा बोध मात्र थोडयांनाच होतो. एक तर्काच्या अधिष्ठानावर झालेला बोध व दुसरा अनुभवाच्या पातळीवर झालेला प्रत्यक्ष बोध. यासाठीच साधुसंत आपल्याला नामाची अखंड साधना करायला सांगतात. सर्व साधनांचं सार म्हणजे नामस्मरण या बोधालाच आत्मानुभव म्हणतात. इतर वस्तूंचा अग्नीला स्पर्श झाली की थोडीतरी काजळी उरतेच, पण कापराला मात्र अग्नीचा स्पर्श झाला की तो अग्नीत मिसळून जातो खाली काही शिल्लक रहात नाही, फक्त आकाश उरतं. त्याप्रमाणे जीवाला आत्मानुभवाचा स्पर्श झाला की त्याच्या अहंभावाचं सोहंभावात रूपांतर होतं व त्याच्या ठिकाणी जीवभावाचा लोप होऊन आत्मभाव उदयास येतो. मी देह आहे ही वृत्ती जाते व मी आत्मा आहे ही वृत्ती जागृत होते. काही काळाने ही वृत्तीही मुरून जाते व आत्मस्वरूप फक्त शिल्लक रहातं.

संतसंगतीने हरिभक्त साधुच्या अंकित झाला की मग त्याचं भाग्य उजळून जातं आणि मग त्याची संसारातील आसक्ती कमी होत-होत शेवटी नाहीशी होते. मग त्या भक्ताला आपल्या हृदयात भगवंताचं दर्शन होतं आणि मग त्याला मोक्षप्राप्ती होते. ज्याला मोक्षाची तळमळ असते त्याला मुमुक्षू म्हणतात. मोक्षप्राप्ती होणे हा त्याचा एकच ध्यास असतो.

ज्ञानेश्वरमाऊली म्हणतात की साधकाला सज्जनाच्या संगतीत अतीशय गोडी असली की संतांनी केलेल्या उपदेशाचा बोध होऊ लागतो. मग त्या बोधाप्रमाणे साधकाची आसक्ती कमी-कमी होत-होत शेवटी नाहिशी होते. मग त्याला मोक्षप्राप्ती होते व सर्वत्र हरीच दिसू लागतो. जनात दिसू लागतो, वनात दिसू लागतो. इतकंच काय तर आत्मस्वरूपात देखील त्याला हरीच दिसू लागतो. ज्यात हरी नाही असा एक अणूसुध्दा या जगात नाही असं त्याच्या अनुभवास येऊ लागतं.

000000

## रविवार - ७

**पर्वताप्रमाणें पातक करणें | वज्रलेप होणें अभक्तांसी ||१||**
**नाही ज्यांसी भक्ति ते पतित अभक्त | हरीसी न भजत दैवहत ||२||**
**अनंत वाचाळ बरळती बरळ | त्यां कैंचा दयाळ पावे हरि ||३||**
**ज्ञानदेवा प्रमाण आत्मा हा निधान | सर्वांघटीं पूर्ण एक नांदे ||४||**

**विवरण -** साधुसंत असं म्हणतात, की जीव हा वस्तुत: परमात्मा असता, आकाशालाही पोटात ठेवणारं चिदाकाश हे त्याचं खरं स्वरूप असताना स्वत:चा संकोच करून स्वत:ला देहा इतकंच मानणे, मी देहच आहे असे म्हणणे हेच फार मोठे पातक करणं होय. हे पापच आपल्या प्रपंचाचं मूळ होय आणि म्हणूनच हा संसार अंती दु:खरूप झाला आहे. या पापाचा नाश करण्याचे सामर्थ्य फक्त ईश्वरभक्तित आहे. देवाचे मनोभावे म्हणजे मनापासून स्मरण करणे, प्रेमाने त्याची आठवण करणे व आवडीने त्याच्या नामाचे संकीर्तन करणे याचे नाव भक्ति. या भक्तिनेच भगवत्कृपा होऊन साधकाची देहबुध्दीच्या महापातकापासून मुक्तता होते. पण याच्या उलट जे या भक्तिच्या मार्गाला जात नाहीत अशा अभक्तांना तेच वज्रलेप होतं. त्या पातकाचं बंधन ढिलं होण्याऐवजी ते जास्त जास्त दृढच होऊ लागतं व त्याची पूर्ण अधोगती होते. हरिची भक्ति न करणारे हे खरोखरंच पतित व दैवहंत होत. अशी अभक्त मंडळी पुष्कळ वाचाळता करतात म्हणजे पोपटाप्रमाणे फक्त वायफळ बडबड करतात व मनाला येईल ते बरळतात. पण देवाचे नाव मात्र वाचेने चुकूनसुध्दा घेत नाहीत. उलट नामस्मरण व ईश्वरभक्ति करणा-या भक्तांची ही मंडळी वाटेल तशी कुटाळकी करतात, निंदा करतात. अशा या अभक्तांना देव दयाळू असूनसुध्दा पावत नाही. 'भाव तसा देव' हा देवाच्या दरबारातील न्याय आहे. अभक्तांना देवाचे अस्तित्वच मान्य नसल्यामुळे तो पावण्याचा प्रश्नच नाही. भक्तांसाठी देव दयालु असतो. कारण त्यांचा तसा भाव असतो. म्हणून ज्ञानेश्वर महाराज सांगतात की, तुला जर खरा भक्त व्हायचं असेल व तुझ्यावर भगवंताची कृपा व्हावी असं तुला वाटत असेल तर आत्मा हेच जीवाचे खरे निधान आहे व तोच सर्वत्र भरून राहीला आहे या सिध्दांताला प्रमाण मानून त्याची भक्ति म्हणजे उपासना कर. ही उपासना करण्याचा सोपा मार्ग म्हणजे नामस्मरण.

**000000**

# सोमवार - ८

संतांचे संगती मनोमार्ग गती | आकळावा श्रीपती येणें पंथें ||१||
रामकृष्ण वाचा भाव हा जीवाचा | आत्मा जो शिवाचा रामजप ||२||
एक तत्त्वीं नाम साधिती साधन | द्वैताचें बंधन न बाधिजे ||३||
नामामृत गोडी वैष्णवां लाधली | योगियां साधली जीवनकळा ||४||
सत्वर उच्चार प्रल्हादीं बिंबला | उध्दवा लाधला कृष्णदाता ||५||
ज्ञानदेव म्हणे नाम हें सुलभ | सर्वत्र दुर्लभ विरळा जाणें ||६||

**विवरण** - आपल्या मनाचा कल साहजिकपणे इंद्रियाकडे असतो आणि इंद्रिये ही स्वभावत:च बहिर्मुख असतात व मन इंद्रियांच्या मदतीने विषयांकडे सुखाच्या आशेने ओढ घेते. हा मनाचा नैसर्गिक अधोगतीचा मार्ग आहे. या मनाच्या गतीला थांबवून त्याला अंतर्मुख करणे हा परमेश्वर प्राप्तीचा मार्ग आहे. परंतु जोपर्यंत संतसंगती लाभत नाही तोपर्यंत मनाची चंचलता नष्ट होत नाही व ते ईश्वरचरणी स्थिर होणे शक्य नाही. संतसंगतीचा महिमाच असा आहे की मन विषयांना विन्मुख होऊन ईश्वराला सन्मुख होते याचे कारण असे आहे की संतसंगतीत साधकाला भगवन्नाम घ्यावेसे वाटते. ज्यामुळे मन आपोआप अंतर्मुख होऊन ईश्वरचरणी स्थिर होते. वास्तविक ज्या नामाने हा लाभ होतो व जे रामनाम शंकराचे अत्यंत आवडते आहे ते नाम वाचेने अखंड घेणे हा वास्तविक जीवाचा स्वभाव, स्वधर्म आहे. रामनाम हे शिवाचा जणू आत्माच आहे. या स्वधर्माला जीव मुकला म्हणून तो अखंड सुखाला आचवला. ईश्वराचे अखंड नामस्मरण असणे हा जीवाचा स्वधर्म त्याने सोडला आणि विषयांचा ध्यास घेऊन त्याने परधर्म स्वीकारला म्हणून त्याची अधोगती झाली व तो दु:खरूप झाला असे हे नाव हे एक तत्व आहे जे साक्षात परब्रम्ह आहे. अशी नामस्मरणाची साधना करणा-या भक्ताला द्वैताचे बंधन बाधत नाही. वास्तविक द्वैत हे अद्वैताचे क्रीडांगण असून अद्वैत हे द्वैताचे विश्रामधाम आहे. द्वैत हे निराकार अद्वैताचा आकार आहे. नामाच्या उपासनेने चित्ताचे चैतन्य होऊन हे विश्व म्हणजे प्रभूचा चिदविलास असा बोध साधकाला होतो. म्हणून साधक द्वैताच्या द्वारे तो अद्वैताचा भोग घेत रहातो. हा भोग म्हणजे नामामृताचे सेवन मोठया कष्टाने योग्याला सहस्त्रदलकमलातील अमृत मिळते. प्रल्हादाला हे नाम नारदांच्या कृपेने मिळाले, तर उध्दवाला तेच नाम श्रीकृष्णाच्या कृपेने लाभले. म्हणून ज्ञानेश्वर महाराज म्हणतात की या सुलभ भगवन्नामाचे माहात्म्य जाणणारे संत या जगात फार थोडे आहेत. म्हणून साधकाने संतसंगती करून आपला लाभ करून घ्यावा.

00000000

विष्णुविणें जप व्यर्थ त्याचें ज्ञान | रामकृष्णीं मन नाही ज्याचें ||१||
उपजोनी करंटा नेणे अद्वय वाटा | रामकृष्णे पैठा कैसा होय ||२||
द्वैताची झाडणी गुरूविण ज्ञान | त्या कैंचें कीर्तन घडे नामीं ||३||
ज्ञानदेव म्हणे सगुण हें ध्यान | नामपाठ मौन प्रपंचाचें ||४||

**विवरण** - भगवन्नामाचा जप करण्याऐवजी इतर नाना प्रकारचे तंत्रयुक्त मंत्राचे जप करणारे पुष्कळ लोक आढळतात. परंतु संतांचे असे सांगणे आहे की भगवन्नामाच्या जपाव्यतिरिक्त इतर सर्व जप व्यर्थ होत. कारण त्या तंत्रयुक्त मंत्रांचा जप करणे साधकाला हितावह नाही. कारण तंत्रयुक्त मंत्रजप विधिविधानपूर्वक जपायचे असतात. त्यात जराशी चूक झाली तरी क्षमा नाही. भगवन्नाम हा मंत्रराज आहे. त्याला विधिविधान नाही. कुठल्याही त-हेची बंधने नाहीत. म्हणून भगवन्नामाचा जप सोडून इतर जप करणे निरर्थक होय. भगवंताच्या चरणी प्रेम नसेल तर मिळवलेले ज्ञान, विद्वत्ता, पांडित्य सर्व व्यर्थ होय. कारण अशा विद्वत्तेने अहंकार निर्माण होऊन तो सर्वनाशास कारणीभूत व्हायचा हे निश्चित.
ज्ञानेश्वर महाराज सांगतात.

"नवल अहंकाराची गोठी | विशेषे न लगे अज्ञानापाठी |
सज्ञानाचे झोंबे कंठी | नाना संकटी नाचवी ||"

ज्या नामाने भगवतप्रेम प्राप्त होते ते नाम ही खरी अद्वैताची वाट आहे, वैकुंठाला नेणारी जवळची व सुखाची वाट आहे. ज्या ठिकाणी वृत्ति कुंठीत होऊन समाप्त होते त्या ठिकाणाला वैकुंठ म्हणतात. ते ठिकाण म्हणजे जेथे द्वैताचे भान नाही असे आपले अद्वैत स्वस्वरूप. जन्माला येऊन ज्याने संताना विचारून नामाची वाट अनुसरली नाही तो खरोखर करंटा म्हणजे दुर्दैवी आहे. अशाना भगवंताचे चरण कसे प्राप्त होतील ? गुरूबोधाने ते ज्ञान प्राप्त होते. त्या ज्ञानाच्या प्रभावाने द्वैत आपोआप मावळू लागते व अद्वैतस्वरूप दृष्टीत भरू लागते. मी हे देवाचे रूप आहे, देह हा देवाचा आकार आहे व विश्व हा देवाचा चिद्‌विलास आहे असे ज्ञान साधकाला होऊ लागते तसतसे प्रेम अंत:करणात संचरू लागते. या प्रेमाचा भोग भक्त भगवंताला त्याच्याच नामाने गाऊन, आळवून, संकीर्तन करून घेऊ लागतो. मग द्वैताची झाडणी झाल्यावाचून कशी राहील? नाम हेच देवाचे सगुण ध्यान आहे. नाम हेच देवाचे रूप आहे. अशा दिव्य नामाच्या पाठाने प्रपंच मौनवत होऊन जातो म्हणजे स्वरूपाच्या स्मृतीत प्रपंच विरून जातो.

000000

त्रिवेणीसंगमीं नाना तीर्थे भ्रमी | चित्त नाहीं नामीं तरी तें व्यर्थ ||१||
नामासी विन्मुख तो नर पापिया | हरीविण धांवया न पावे कोणी ||२||
पुराणप्रसिध्द बोलिले वाल्मीक | नामें तिन्ही लोक उध्दरती ||३||
ज्ञानदेव म्हणे नाम जपा हरीचें | परंपरा त्याचे कुळ शुध्द ||४||

विवरण - तीर्थाच्या ठिकाणी जबरदस्त श्रध्दा असल्या वाचून ती जीवाला पावन करू शकत नाहीत. अशी नितांत श्रध्दा सर्वसाधारणत: कोणाच्याच ठिकाणी नसते. नेहमी केवळ रूढी म्हणूनच तीर्थयात्रेला जाणारी मंडळी आढळतात. अशांना उद्देशून तुकाराम महाराज म्हणतात. 'तीर्थी धोंडा पाणी | देव रोकडा सज्जनी |'

भगवन्नामावर श्रध्दा नसणे म्हणजे भगवंतावरच श्रध्दा नसणे होय. ज्याची भगवंतावर श्रध्दा नाही त्याची तीर्थाच्या ठिकाणी खरी श्रध्दा असणे शक्य नाही. म्हणूनच अशा लोकानी कितीही तीर्थयात्रा केल्या तरी त्या व्यर्थ होत. तीर्थक्षेत्राला जाण्याची जी परंपरा आहे त्यातील अंतर्यामी हेतू साधकाला भरपूर नामस्मरण करण्याची सवड मिळावी हाच आहे. तीर्थयात्रेत गेल्यावर डोक्याला दुसरा कसलाच व्याप नसल्यामुळे साधकाला मनसोक्त नामस्मरण करण्याची संधी असते. तीर्थक्षेत्रात त्याला नामाचा छंद लागावा व हा छंद घरी परत आल्यावर संसारात तसाच चालू रहावा हाच तीर्थक्षेत्राला जाण्याचा अंतस्थ हेतू आहे.

जो नामाला विन्मुख आहे, ज्याला नामाची आवड नाही तो मनुष्य पापी आहे असे समजावे. अशा पापी मनुष्याचा उध्दार करण्याचे सामर्थ्य हरीशिवाय दुस-या कोणातच नाही. नामाची आवड नसणे म्हणजे प्रत्यक्ष भगवंताचाच उपहास करणे होय. हे पाप जो मनुष्य करतो त्याला तारण्याचे सामर्थ्य हरीवाचून दुस-या कोणात असू शकेल? नाम हे एवढे श्रेष्ठ व समर्थ आहे की तीनही लोकांचा उध्दार करण्याचे सामर्थ्य त्यात आहे असे वाल्मिकी ऋषींचे सांगणे आहे. तीन लोक म्हणजे तीन अवस्था जागृति, स्वप्न व सुषुप्तीत जीव नांदत असतो. या तीन अवस्थांच्या पलीकडे तुर्यावस्थेत जाऊन त्या ठिकाणी स्थिर होऊन उन्मनी स्थिती प्राप्त करून घेतल्याशिवाय जीवाचा ख-या अर्थाने उध्दार होत नाही. जो नामाचा अखंड जप करतो त्याच्या कुळाची परंपरा शुध्द होते. कुळ म्हणजे गोकुळ. गो म्हणजे इंद्रिय आणि कुळ म्हणजे इंद्रियांचा समुदाय. पाच कर्मेंद्रिय व पाच ज्ञानेंद्रिय व मन, बुध्दी, चित्त व अहंकार अशी एकूण चौदा इंद्रिये आहेत. नामाने इंद्रियांची पूर्वपरंपरा स्थिध्द होते.

000000

## गुरूवार - ११

हरि उच्चारणीं अनंत पापराशी | जातील लयासी क्षणमात्रें ||१||
तृण अग्निमेळें समरस झालें | तैसें नामें केलें जपता हरी ||२||
हरी उच्चारण मंत्र पैं अगाध | पळे भूतबाधा भयें याचे ||३||
ज्ञानदेव म्हणे हरि माझा समर्थ | न करवें अर्थ उपनिषदां ||४||

**विवरण -** ज्याप्रमाणे गवताच्या भा-याला अग्नीचा नुसता स्पर्श जरी झाला तरी ते सर्व गवत जळून खाक होते, त्याप्रमाणे पापाच्या राशीला हरीच्या उच्चाराचा स्पर्श झाला तर ती पापं अनंत असली तरी क्षणांत जळून भस्म होतात. ही पापं काम, क्रोध, मोह, मद, मत्सर या षड्विकारातून निर्माण होतात. हे विकार जळून खाक झाल्याशिवाय पापांची टांकसाळ बंद पडणार नाही. देवाचा विसर म्हणजे स्वरूपाची विस्मृती. हीच सर्व पापांच्या व दु:खाच्या निर्मितीला कारण आहे. अखंड नामस्मरणाने 'मी देवाचा' हा बोध साधकाच्या अंत:करणात स्फुरू लागतो. नामाच्या प्रभावाने दोन प्रकारची बाधा नाहीशी होते. एक भूतबाधा किंवा पिशाच्चबाधा आणि कल्पनेची बाधा. ज्याप्रमाणे सूर्यप्रकाश आला की अंधार पळून जातो, त्याप्रमाणे नामाच्या उच्चाराने वातावरणात पवित्र व तेजस्वी चैतन्याच्या लहरी निर्माण होतात. त्यामुळे तिथली भूते ठिकाण सोडून पळून जातात. नामोच्चाराने कल्पनेची बाधाही नष्ट होते. या संबंधात नामदेव महाराज म्हणतात.

**"कल्पनेची बाधा न हो करणे काळी | ही संतमंडळी सुखी असो |**
**अहंकाराचा वारा न लगो राजसा | माझिया विष्णुदासा भाविकासी |**
**नामा म्हणे तया असावे कल्याण | ज्या मुखी निधान पांडुरंगी ||"**

मी देवरूप असता 'मी देहच आहे' अशी जीवाने फार प्राचीन काळापासून कल्पना केली आहे. त्यामुळेच त्याच्या मागे नानाप्रकारची संकट परंपरा लागली आहे. हरि व हरिनाम ही खरोखर अलौकिक आहेत. त्यामुळे वेद-उपनिषदांसुध्दा या समर्थ हरीच्या स्वरूपाचा थांगपत्ता लागला नाही. म्हणजे ती नेति नेति (न इति) म्हणत मौन धारण करतात. **'श्रुति नेति म्हणती एक गोविंदु रे |** असे दिव्य, पवित्र व अलौकिक नाम कंठात धारण करून प्रत्येकाने आपले कोटकल्याण करून घ्यावे असे ज्ञानेश्वर महाराज म्हणतात.

00000

# शुक्रवार - १२

**तीर्थ व्रत नेम भावेंवीण सिध्दी | वायांचि उपाधी करिसी जना ||१||**
**भावबळें आकळे एरवी नाकळे | करतळीं आंवळे तैसा हरी ||२||**
**पारियाचा रवा घेतां भूमीवरी | यत्न परोपरी साधन तैसें ||३||**
**ज्ञानदेव म्हणे निवृत्ति निर्गुण | दिधलें संपूर्ण माझे हातीं ||४||**

**विवरण -** ईश्वरचरणी अनन्य भाव असणं हे परमार्थाचं वर्म आहे. हा भाव नसेल तर तीर्थयात्रेला जाणं, व्रतवैकल्य करणं व नानाप्रकारचे नेमधर्म करणं म्हणजे व्यर्थ स्वत:ला त्रास करून घेणं आहे. याउलट जर ईश्वराच्या ठिकाणी अनन्य भाव असेल तर इतर नाना प्रकारची साधनं करून व्यर्थ कष्ट घेण्याचेही कारण नाही. या संबंधात तुकाराम महाराज म्हणतात **'तीर्थी धोंडा पाणी | देव रोकडा सज्जनी ||"** इतकं भावाचं सामर्थ्य अदभूत आहे. भावाची जोपासना हीच देवाची उपासना आहे. परंतु भाव कशाला म्हणतात हे नीट समजलं पाहिजे. मी देवाचं रूप आहे व देव 'मी' चं रूप आहे. हा जो 'मी व 'देव' याचा संबंध त्या संबंधाला भाव असं म्हणतात. वास्तविक चैतन्यशक्तीच्या रूपाने देवच या देहांत प्रगट आहे. या चैतन्यशक्तीच्या रूपाने तोच आपल्याकडून कर्म करून घेतो. या भावाचं बळ वाढविणं हाच परमार्थाचा मार्ग होय. म्हणजे या भावाची ठिणगी फुंकून तिची ज्वाळा करणे हाच परमार्थ सोपान आहे. हे रूपांतर संतसंगती व नामस्मरण यांच्या प्रभावाने होतं. भावाचं इवलंसं असलेलं हे रोप नामस्मरणाच्या सिंचनाने वाढीस लागतं व त्याचा वेल गगनाला म्हणजे चिदाकाशाला जाऊन भिडतो. साधकाचा जीवभाव नष्ट होतो व **'अणोरणीया थोकडा | तुका आकाशा एवढा |** असा ब्रम्हभाव त्याच्या ठिकाणी स्फुरू लागतो. अशा रितीने भावाच्या बळावर एरव्ही न कळणारा देव, साधकाला प्रत्यक्ष समजू लागतो. ज्याप्रमाणे हातावर घेतलेले आवळे सर्व बाजूंनी स्पष्ट दिसू लागतात. हा भाव नसेल तर देवाच्या प्राप्तीसाठी केलेली इतर साधने ही जमिनीवर पडलेले पा-यांचे कण गोळा करण्या सारखे व्यर्थ प्रयत्न होत. परब्रम्हाचं निर्गुण स्वरूप हे आकळण्याच्या पलीकडे आहे. या निर्गुण स्वरूपाला नामाच्या स्मरणाने सगुण रूप लाभतं व अंत:करणात दिव्य ज्ञानज्योत उजळून त्यातून असं अनुभवास येतं की भगवन्नाम हा नुसता शब्द नसून ते देवाचं सगुण रूपच आहे.

**000000**

## शनिवार - १३

समाधी हरीची समसुखेंवीण | न साधेल जाण द्वैतबुध्दि ||१||
बुध्दीचें वैभव अन्य नाहीं दुजें | एका केशवराजे सकळ सिध्दी ||२||
ऋध्दि सिध्दि निधी अवघीच उपाधी | जंव त्या परमानंदीं मन नाहीं ||३||
ज्ञानदेवी रम्य रमलें समाधान | हरीचें चिंतन सर्व काळ ||४||

**विवरण** - समसुख म्हणजे प्रेमसुख. द्वैतबुध्दी म्हणजे देहबुध्दी व जाण म्हणजे जाणीव. देहबुध्दीची निवृत्ती म्हणजे मुक्ती व प्रेमसुखाची प्राप्ती म्हणजे भक्ती. भक्ती व मुक्ती या दोन्ही साध्य झाल्याशिवाय हरीची समाधी साध्य होत नाही. हरीची समाधी ही योग्याच्या समाधीपेक्षा वेगळी आहे. योगसमाधीत योगी इंद्रियांचें दरवाजे बंद करून आपला मीपणा 'स्वरूपात' मिळवून टाकतो व या अवस्थेत त्याचे जगाशी संबंध तुटतात. पण समाधीचा भंग झाल्यावर योगी पुन्हा देहभानावर येतो व पुन्हा तो द्वैताच्या जाळयात अडकतो. याच्या उलट अखंड नामस्मरण ही मुक्तीपेक्षा श्रेष्ठ अशी भक्ती आहे. ही हरीची समाधी प्राप्त करून घेण्यातच सकळसिध्दी असून तेच खरे बुध्दीचे वैभव आहे. नाहीतर जगात अनेक लोक बुध्दिमान असतात. पण त्यांच्या बुध्दीचा सर्व उपयोग केवळ पैसा, किर्ती, सत्ता यांच्या प्राप्तीसाठीच होत असतो. मनुष्याला देवाने जी बुध्दी दिलेली आहे तिचा उपयोग याचसाठी करणे म्हणजे बुध्दीचा दुरूपयोग करणे होय. बुध्दीचे खरे वैभव यात नसून केशवराजाची म्हणजे भगवंताची कृपा संपादन करणे हे आहे. भगवंताचा कृपाप्रसाद जोपर्यंत मिळत नाही म्हणजे त्याचे चरणांशी जोपर्यंत मन स्थिर रहात नाही तोपर्यंत कितीही संपत्ती, शक्ती (योगशक्ती व दैवशक्ती) मिळाली तरी ती साधकाला व्यर्थ उपाधीच होते. त्यापासून त्याला परमसुख व शांती न मिळता त्याची अधोगतीच होण्याची शक्यता असते. हरीची समाधी प्राप्त झाल्यावर अत्यंत रम्य असे समाधान नामस्मरण करणा-या साधकाच्या अंत:करणात अखंड रमते. वास्तविक समाधान प्राप्त करून घेण्यासाठीच सर्व मनुष्यमात्राची धडपड असते. पण अखंड प्रयत्न करूनही ते समाधान कोणालाही प्राप्त होत नाही. ज्याप्रमाणे स्वत:ची सावली पकडणा-या माणसाला ती कधीच पकडता येत नाही. त्याप्रमाणे समाधान प्राप्त करून घेण्याची धडपड करणा-या माणसाच्या हातात ते कधीच सापडत नाही. साधकाला मात्र या समाधानासाठी धडपड करावी लागत नाही तर त्याच्या अंत:करणात हे समाधान आपोआपच वस्तीला येते.

000000

नित्य सत्य मित हरिपाठ ज्यासी | कळिकाळ त्यासी न पाहे दृष्टी ||१||
रामकृष्णीं उच्चार अनंतराशी तप | पापाचे कळप पळती पुढें ||२||
हरि हरि हरि मंत्र हा शिवाचा | म्हणती जे वाचां तयां मोक्ष ||३||
ज्ञानदेवा पाठ नारायण नाम | पाविजे उत्तम निजस्थान ||४||

**विवरण -** नामस्मरण नित्य म्हणजे सर्वकाळ झाले पाहिजे. त्याचप्रमाणे ते सत्य असले पाहिजे. याचा अर्थ असा की विषयप्राप्तीच्या इच्छेने म्हणजे मूल होण्यासाठी, नोकरी मिळण्यासाठी, धन मिळण्यासाठी जे नामस्मरण केले जाते ते या सदरात येत नाही. या नामस्मरणात विषयप्राप्ती हे ध्येय असते व नामस्मरण हे त्याचं साधन असतं. म्हणून हे नामस्मरण असत्य असतं. याचा अर्थ असा नाही की नामस्मरण फुकट जाते. नामस्मरण कसेही केले तरी ते फुकट जात नाही. परंतु देवाचं प्रेम निर्माण होऊन केलेलं नामस्मरण हे सत्य नामस्मरण होय. या नामस्मरणात देवाच्या प्रेमावाचून दुसरे काही मिळावे अशी अपेक्षाच नसते. परंतु असे नामस्मरण कितीही श्रेष्ठ असले, तरी सर्वसामान्यांच्या बाबतीत असं नामस्मरण सुरवातीला घडणं शक्यच नसतं. कारण गेल्या जन्मीच्या वासना अपुऱ्या राहिल्यामुळे माणसाला हा जन्म घ्यावा लागतो. या संबंधात तुकाराम महाराज म्हणतात, **"वासनेच्या संगे | जन्म घ्यावा लागे |"** ही वासना शांत व्हावी म्हणून या जन्मी जीवाला अनेक प्रकारची धडपड करावी लागते. परंतु या धडपडीतून विषयांचा मोह वाढत जातो व याचा अंतिम परिणाम तळमळ व तडफड वाढण्यात होतो. पण विषयप्राप्तीच्या इच्छेने केलेले नामस्मरण हे सुरवातीला असत्य असले तरी त्याची परिणती सत्य नामस्मरणात होते. पण अशा नामधारकाकडे कधी काळ वाकडया नजरेने पाहू शकत नाही. नित्य, सत्य व अमित अशा नामस्मरणाने तपाच्या राशी साठवल्या जातात, व पापांचे कळप जीवाला सोडून पळत सुटतात. ज्या रामनामाच्या प्रभावाने शंकराने हलाहल पचवले ते नाम जो साधक घेतो त्याला मोक्षप्राप्ती होते. भगवंताचे चरण हे जीवाचे निजस्थान आहे व ते उत्तम आहे. हे स्थान जीवाला नामस्मरणाने प्राप्त होते. मग जीव अखंड आनंदाच्या सिंहासनावर विराजमान होतो कारण त्याला स्वरूपाची स्मृती प्राप्त होते.

000000

**एक नाम हरी द्वैतनाम दूरी | अद्वैतकुसरी विरळा जाणें ||१||**
**समबुध्दी घेतां समान श्रीहरी | शमदमांवरी हरि झाला ||२||**
**सर्वांघटीं राम देहा देहीं एक | सूर्यप्रकाशक सहस्त्ररश्मी ||३||**
**ज्ञानदेवा चित्तीं हरिपाठ नेमा | मागलिया जन्मा मुक्त झालों ||४||**

**विवरण -** ईश्वरप्राप्तीची अनेक साधने आहेत, पण त्याचं नामस्मरण हे एकच साधन असं आहे की ते अत्यंत सुलभ असूनसुध्दा फार प्रभावी आहे. हे नामस्मरण म्हणजे जीवाचा द्वैतभाव बाजूला सारून त्याला अद्वैत स्थिती प्राप्त करून देणारी उत्कृष्ट अशी कला आहे. परंतु हे अनुभवाने जाणणारा या जगात विरळाच आहे. कारण असा अनुभव येण्यासाठी नामस्मरणाच्या प्रक्रियेबाबत जी असाधारण चिकाटी असावी लागते, ती सर्व साधारणत: सामान्य साधकाच्या ठिकाणी आढळून येत नाही. याच्या उलट जे साधक श्रध्देने व निष्ठेने अखंड नामस्मरण करून आपलं मन व बुध्दी ईश्वराच्या चरणी समर्पित करतात, त्यानाच हरी सर्वत्र भरलेला आहे असा अनुभव येतो. या मार्गाचं वैशिष्टय म्हणजे साधकाला योगमार्गाने जाणा-या साधकांप्रमाणे शम म्हणजे मनाचे नियमन व दम म्हणजे इंद्रियांचे दमन करावे लागत नाही. कारण की ज्या मनाचं नियमन करायचं तें मनच नामस्मरणात रंगून गेल्यावर त्याचं नियमन करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. तसेच सर्व इंदियाना हरिप्रेमाचा लळा लागल्यावर त्यांचही वेगळं दमन करावं लागत नाही. म्हणून ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, -

**'यम म्हणे काय यमावे | दम म्हणे कवणाते दमावे |**
**तीर्थे म्हणती काय खावे | दोष ओखदासी (औषधाला सुध्दा) नाही |**

या उलट शम-दमांचा अभ्यास करणा-या योगसाधकाना मानसिक व शारीरिक क्लेश होत असतात व बहुधा ते शीघ्रकोपी होतात. त्यामुळे जरा एखादी गोष्ट त्यांच्या मनाविरूध्द घडली की या जगात सर्वत्र हरी नटलेला आहे, असे अनुभवाला यायच्या ऐवजी जग म्हणजे वैरी आहे असेच त्याना वाटू लागते. पण ज्याप्रमाणे हजारो किरणांना प्रकाशित करणारा सूर्य एकच असतो. त्याप्रमाणे सर्व देहातून एकच परमात्मा विलसत असतो असा नामधारकाचा अनुभव असतो. ज्ञानेश्वर महाराज सांगतात की, माझ्या चित्तात नामाचं अखंड प्रेम वहात आहे म्हणून मी गेल्या जन्मीच मुक्त झालो असून त्या मुक्तीचा भोग नामसंकीर्तनाने घेण्यासाठीच या जन्मी मी जन्माला आलो आहे.

000000

## मंगळवार - १६

हरिनाम जपें तो नर दुर्लभ | वाचेंसी सुलभ राम कृष्ण ||१||
राम कृष्ण नामीं उन्मनी साधली | तयासी लाधली सकळ सिध्दी ||२||
सिध्दी बुध्दी धर्म हरिपाठीं आले | प्रपंचीं निमाले साधुसंगें ||३||
ज्ञानदेवीं नाम रामकृष्ण ठसा | तेणें दशदिशा आत्माराम ||४||

**विवरण -** ईश्वरप्राप्तीच्या सर्व साधनांमध्ये नामस्मरणासारखे दुसरे सोपे साधन नाही. नामाला कोणत्याही वर्णाची, जातीची, धर्माची आडकाठी नाही. नामाची कसलीही किंमत चुकवावी लागत नाही. त्याचप्रमाणे त्याला विद्वान असण्याचीही गरज नाही. तसंच शुचि-अशुचिचाही प्रश्न नामाच्या बाबतीत उद्भवत नाही. तसंच नाम घेण्यास कष्टही पडत नाहीत. पण असे हे नाम सर्वप्रकारे सुलभ असता व ते प्रभावीही असता नाम घेणारी माणसे मात्र दुर्मिळ आहेत. कारण ते इतकं सोपं आहे म्हणूनच लोकांचा त्याच्यावर सहजासहजी विश्वास बसत नाही. उलट नाम घेऊन काय होणार असाच प्रश्न लोक जन्मभर विचारत असतात. पण नाम घेऊन काय होतं ते मात्र ते कधीच पहात नाहीत. पण संतवचनावर विश्वास ठेवून जे कोणी अखंड नामस्मरण करतात ते नाम घेण्यातच रंगून जातात व त्यांच्या मनाचं उन्मन होतं व मग त्याना नामस्मरणाची सिध्दी प्राप्त होते, म्हणजेच स्वरूपसिध्दी प्राप्त होते. नामाच्या स्मरणाने जी प्रभूची सेवा होते त्या सेवेने साधकावर भगवंताची कृपा होऊन त्याला खरं ज्ञान प्राप्त होतं व त्याच्या बुध्दीत पालट होऊम त्याला स्वरूपसाक्षात्कार प्राप्त होतो. नामस्मरणामुळे त्याच्या बुध्दीचा ईश्वराशी संबंध येऊन त्या बुध्दीची समबुध्दी होते. ती प्राप्त झाली असता, साधकाला ईश्वर सर्वत्र सारखा भरून राहिला आहे याची प्रचीती येते. ज्या भगवंताने आपल्याला जन्माला घालून सुंदर असा नरदेह दिला, ज्ञान मिळविण्या -साठी ज्ञानेंद्रिये व कर्म करण्यासाठी कर्मेंद्रिये दिली, अदभूत बुध्दी व तीव्र स्मरणशक्ती दिली त्या भगवंताचं नित्य स्मरण करणं हाच साधकाचा खरा धर्म आहे. नामाच्या उच्चाराने साधकाच्या चित्तावर भगवंताच्या प्रेमाचे ठसे उमटतात व ते चित्त हळूहळू अंतर्मुख होऊ लागतं व त्यावर साठवलेला मळ नाहीसा होऊन ते शुध्द होऊ लागतं मग त्या चित्ताचं चैतन्यात रूपांतर होतं. मग त्या चैतन्याच्या रूपाने साधकाला सर्वत्र हरीच भरून राहीला आहे अशी प्रचीती येते.

000000

## बुधवार - १७.

हरिपाठकीर्ति मुखें जरी गाय | पवित्रचि होय देह त्याचा ||१||
तपाचें सामर्थ्यें तपिन्नला अमूप | चिरंजीव कल्प वैकुंठीं नांदे ||२||
मातृपितृभ्राता सगोत्र अपार | चतुर्भुज नर होऊनि ठेले ||३||
ज्ञान गूढगम्य ज्ञानदेवा लाधलें | निवृत्तीनें दिलें माझ्या हातीं ||४||

**विवरण** - संताच्या वचनाचा आधार घेऊन हरिपाठाची कीर्ती म्हणजे महती इतराना नुसती सांगणं व हरिपाठाचा स्वत: अभ्यास करून त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेऊन मग त्या नामाची महती जगाला सांगणं या दोन वेगळया गोष्टी आहेत. पहिल्या प्रकारात नामाने जगाचं कल्याण व्हावं अशी तळमळ असते. या दोन्ही गोष्टी क्रमाने घडतात. त्यामुळे या दोन्ही गोष्टी करणा-याचा देह हा अत्यंत पवित्र असतो. असा देह धारण करणारा जीव धन्य होय, कारण तोच या नरदेहाचा उत्तम उपयोग करू शकतो. स्वत: नामाचा अभ्यास करून त्याची महती इतराना सांगून त्याना नामाची गोडी लावणं हेच महातप आहे. या तपाच्या सामर्थ्याने नामधारक चिरंजीव होतो, म्हणजे त्याला आपण ख-या अर्थाने अमर आहोत हे समजतं. त्यामुळे देहाचा त्याग केल्यावर तो वैकुंठलोकाला जाऊन तेथे चिरकाल वास करतो. इतकंच काय पण नामधारकाचे माता, पिता, बंधु व गावातले इतर नातलग हे सर्व चतुर्भुज म्हणजे विष्णुरूप किंवा हरिरूप होऊन जातात. या नातलगमंडळीना एकमेकाविषयी प्रेम व आदर असतो. पण याशिवाय जे नामधारकावर प्रेम करतात, त्याच्या विषयी आदर व आपलेपणा बाळगतात. अशी सर्व नामधरकाच्या संगतीने चतुर्भु ज म्हणजे हरिरूप होतात. याचं कारण असं की नामधारकाच्या संगतीने व त्याच्या उपदेशाने या सर्व लोकाना नामाची गोडी लागते व तेच गोड नाम सर्वांचं जीवन गोड करतं. म्हणजेच त्या सर्वांना चतुर्भुज किंवा हरिरूप करतं. हे गूढ पण गम्य असं ज्ञान ज्ञानेश्वरमहाराजाना निवृत्तीनाथांच्या कृपेने प्राप्त झालं. भगवन्नाम हे दिव्य असं नाम आहे व या दिव्य नामाने ज्ञानेश्वरमहाराजाना दिव्य दृष्टी, दिव्य आनंद व दिव्य प्रेम प्राप्त झालं. हे प्रेम अर्थात् निवृत्तीनाथांच्या असीम कृपेमुळेच प्राप्त झालं. म्हणूनच ज्ञानेश्वर महाराज म्हणतात

'हरि मुखें म्हणा, हरि मुखें म्हणा'|.

000000

# गुरूवार - १८

हरिवंशपुराण हरिनाम संकीर्तन | हरिविण सौजन्य नेणें कांहीं ||१||
त्या नरा लाधलें वैंकुंठ जोडलें | सकळही घडलें तीर्थाटण ||२||
मनोमार्गे गेला तों तेथें मुकला | हरिपाठीं स्थिरावला तोचि धन्य ||३||
ज्ञानदेवा गोडी हरिनामाची जोडी | रामकृष्णीं आवडी सर्वकाळ ||४||

**विवरण** - हरीचा वंश दोन प्रकारचा आहे. एक देवाच्या अवताराचा वंश आणि दुसरा संतांच्या अवताराचा. राम, कृष्ण, वामन वगैरे हरीचे देव अवतार, तर ज्ञानदेव, एकनाथ, नामदेव, तुकाराम वगैरे हरीचे संत अवतार. हरीच्या या दोन्ही वंशाच्या पुराणकथा किंवा गोष्टी ज्याला प्रिय आहेत, ज्याला हरिनामसंकीर्तन प्रिय आहे किंवा ज्याला हरिनाम-संकीर्तना वाचून काहीच प्रिय नाही व हरी हाच ज्याच्या सुखाचा, सौजन्याचा विषय आहे, अशा भाग्यवान साधकालाच इहलोकी वैकुंठ लोकांची प्राप्ती होते. कारण ज्याठिकाणी वैकुंठनायक हजर असतो त्या ठिकाणाला भगवंताच्या स्पर्शाने वैकुंठलोकाचं स्वरूप आपोआप प्राप्त होते. स्वत: भगवंत नारदाला सांगतात की :

"नाहं वसामि वैकुंठे योगिनां हृदये रवौ |
मद्भक्त: यत्र गायन्ति तत्र तिष्ठामि नारद ||"

अर्थ - हे नारदा, मी वैकुंठात नसतो व योग्यांच्या हृदयातही नसतो तर माझे भक्त जेथे माझ्या गुणांचं गायन करतात तिथे मी तिष्ठत उभा असतो. त्याचप्रमाने नामधारकाला तीर्थाटण करण्याचीही जरूरी नाही. कारण हरिप्रेमात रंगून गेलेल्या नामधारकाचा देह हाच सर्व तीर्थाचं माहेरघर असतो. तुकाराम महाराज म्हणतात,

'धन्य धन्य ते शरीर | तीर्थव्रतांचे माहेर ||'

भगवंताचं नाम हेच महातीर्थ आहे. या महातीर्थात अखंड स्नान करणा-या नामधारकाला दुस-या तीर्थाकडे जाण्याची आवश्यकताच नाही. जो जीव वहिर्मुख होऊन कर्ममार्गाने इंद्रियांच्या द्वाराने विषयांच्या आडरानात शिरला त्याने सर्वनाश ओढवून घेतला व जो नामाच्या दाराने हरिपाठाच्या चरणी स्थिर झाला तो जीव धन्य झाला. सर्वांना हरिनामाची गोडी लागली पाहिजे. मग सर्व चंचलता निघून जाऊन मन रामकृष्णचरणी आवडीने स्थिर होतं.

0000000

## शुक्रवार - १९

वेदशास्त्रुराण श्रुतीचें वचन | एक नारायण सार जपा ||१||
जप तप कर्म हरीविण धर्म | वाउगाचि श्रम व्यर्थ जाय ||२||
हरिपाठीं गेले ते निवांतचि ठेले | भ्रमर गुंतले सुमनकळिकें ||३||
ज्ञानदेवीं मंत्र हरिनामाचें शास्त्र | यम कुळगोत्र वर्जियेलें ||४||

**विवरण -** ज्ञानेश्वर महाराजांनी सांगितलेल्या नामजपाच्या सिध्दांताला वेदशास्त्राचा आधार आहे का असा जर कोणाला प्रश्न पडला असेल तर त्याला ज्ञानेश्वर महाराजानी उत्तर या अभंगाच्या पहिल्या चरणात दिलं आहे. ते म्हणतात की नामजप हे सर्व साधनांचं सार आहे. या सिध्दांताला वेद, शास्त्र, पुराण व श्रुति यात पूर्ण आधार आहे. वेदशास्त्रसंमत असाच हा सिध्दांत आहे. याचा अर्थ नामजप न करता अन्य कितीही साधनं केली तरी ती व्यर्थ होत. याच्या उलट इतर काहीही न करता नुसता नामजप केला तरी तो साधकाचं आत्यंतिक कल्याण करतो. कारण इतर साधनात उपाधी व बंधनं आहेत. तर नामजप हा उपाधीरहित व बंधनातीत आहे. जी साधनं स्वत:च उपाधी व बंधनानी युक्त ती साधकाला उपाधिरहित व बंधनमुक्त कशी करणार? नाम हे साधन मात्र उपाधिरहित व बंधनातीत असल्यामुळे नामधारकाला ते उपाधिरहित करून बंधनाच्या पलीकडे नेतं. नामजपाव्यतिरिक्त अनेक प्रकारचे जप असतात. हे विधी विधानपूर्वक जपले तरच त्याचं इष्ट असं फळ मिळतं. पण जर त्यात थोडीशी का होईना चूक झाली तरी हित होण्याऐवजी अहित मात्र होतं. पण मंत्रजपातली बंधन नामजपात नाहीत. नामाचा जप कोणीही केंव्हाही कोठेही, कसाही केला तरी त्याचं फळ मिळतंच. म्हणूनच ज्ञानेश्वर महाराज नामाला मंत्रराज म्हणतात. त्याचप्रमाणे नाममार्ग सोडून देहदंडनाचा, तपाचा मार्ग अनुसरला तर त्यातून संतापाशिवाय दुसरं काहीच पदरात पडत नाही. तीच गोष्ट कर्मा ची. विधिनिषेधपूर्वक कर्म करणं अशक्यच होत. कारण विधि व निषेध दोन्हीही सांभाळता येत नाही. तसंच धर्माचं वर्म न समजता केलेला धर्म हा व्यर्थ होतो. कमलकंदातील मकरंद सेवन करताना भ्रमर इतका रमतो की कमळाच्या पाकळया केव्हा मिटल्या हे त्यास कळतही नाही. त्याचप्रमाणे नामाचं प्रेमसुख घेताना इतका रंगून जातो की त्याचं जीवपण संपून देवपणात कधी रूपांतर झालं हेही त्यास कळतही नाही. अशा नामधारकाचं कुळगोत्रही यम वर्ज्य करतो.

00000

**नाम संकीर्तन वैष्णवांची जोडी | पापें अनंत कोटी गेलीं त्यांचीं ||१||**
**अनंत जन्मांचें तप एक नाम | सर्व मार्ग सुगम हरिपाठ ||२||**
**योग याग क्रिया धर्माधर्म माया | गेले ते विलया हरिपाठीं ||३||**
**ज्ञानदेवीं यज्ञ याग क्रिया धर्म | हरिविण नेम नाहीं दुजा ||४||**

**विवरण :** नाम आणि त्याचं संकीर्तन ही जोडी वैष्णवांना अत्यंत प्रिय असते. जसं दुर्जनाला कांचन व कामिनी ही जोडी अत्यंत प्रिय असते. तसं नामसंकीर्तन हे वैष्णवाना अत्यंत आवडत असतं. किंबहुना नामसंकीर्तन हा त्यांचा प्राणच असतो असं म्हटलं तरी चालेल. जसं अन्नाशिवाय माणसं जगू शकत नाहीत त्याप्रमाणे वैष्णवही नामसंकीर्तना-शिवाय जगू शकत नाहीत. या नामसंकीर्तनाचा स्वभाव इतका मोठा आहे की नामधारकाच्या हातून अनंत कोटी पापं जरी झाली असली तरी नाम ती क्षणार्धात जाळून टाकते. कारण सर्व पापांचं मूळ विकारात आहे, विकारांच मूळ वासनेत आहे. वासनेचं मूळ अहंकारात आहे आणि अहंकाराचं मूळ स्वरूपाच्या विस्मरणात आहे. नामाच्या अखंड संकीर्तनाने नामधारकाला स्वरूपाची ओळख पटते. नामाचे माहात्म्य एवढं मोठं आहे की अनेक जन्म तप करून जी पुण्याई मिळते ते नामस्मरणाने याच जन्मात मिळून जाते. तसंच तपाने जी पुण्यप्राप्ती होते ती फारतर नामधारकाला स्वर्गप्राप्ती करून देईल. पण नाम घेतल्याने जे पुण्य मिळतं ते त्याला मोक्षप्राप्ती करून देईल. या शुध्द पुण्याने नामधारकाला भगवंताचं प्रेमसुख अखंड भोगण्याचं भाग्य मिळतं. नामाचं एवढं अलौकिक सामर्थ्य असूनसुध्दा ते सर्व साधनात सर्वच दृष्टीने अत्यंत सुलभ आहे. नामाच्या या सुलभ पण श्रेष्ठ साधनेपुढे योग, याग, क्रिया, धर्माधर्म आदि सर्व साधनं व्यर्थ होत. कारण अत्यंत कष्ट करून किंवा अपरिमित खर्च करून जे या साधनानी प्राप्त होते त्याच्यापेक्षा कितीतरी अधिक लाभ नामस्मरणाच्या सुलभ साधनाने होतो. या हरिनामाच्या तेजाचा प्रकाश इतका महान आहे की त्याच्या प्रकाशात इतर साधनांचा प्रकाश पूर्णपणे लोपून जातो. ज्ञानेश्वर महाराज सांगतात की गुरूकृपेमुळे नामाचं हे अद्भुत सामर्थ्य मला कळल्यामुळेच नामावाचून योग, याग, क्रिया, धर्माधर्म वगैरे इतर कुठल्याही साधनाचा अवलंब करायचा नाही असा मी निश्चय केला आहे व मी या अभंगातून सर्वांना हाच उपदेश करीत आहे.

00000

## रविवार - २१

**काळ वेळ नाम उच्चारितां नाहीं | दोन्ही पक्ष पाहीं उध्दरती ||१||**
**रामकृष्ण नाम सर्व दोषा हरण | जडजीवां तारण हरि एक ||२||**
**हरिनाम सार जिव्हा या नामाची | उपमा त्या देवाची कोण वानी ||३||**
**ज्ञानदेवा सांग झाला हरिपाठ | पूर्वजां वैकुंठ मार्ग सोपा ||४||**

**विवरण :** हरिनामाचा उच्चार करण्यासाठी विशिष्ट काळ किंवा विशिष्ट वेळ ठरवावी लागत नाही. सामान्यपणे संकल्पपूर्वक कोणतेही कर्म किंवा विधिनिधान करावयाचे झाल्यास शास्त्राप्रमाणे महिना, पक्ष, तिथी निश्चितपणे शुभ आहे की नाही हे बघावे लागते. त्याच्या तुलनेने पहाता हरिनाम घेण्यासाठी मुहूर्त बघावा लागत नाही. म्हणजेच ज्याना हरिनाम घ्यायचे आहे त्यांना लगेच, केव्हाही घेता येते. नाम घेण्यातील ही मोठी सोयीची गोष्ट आहे. कित्येक सत्कर्मेही जसे मुंज, विवाह, मंगलकार्ये 'सध्या मुहूर्त नाही' म्हणून लांबणीवर टाकावी लागतात. ती अडचण नामस्मरणाच्या बाबतीत नाही असे ज्ञानेश्वर सांगत आहेत. ते असेही म्हणतात की कोणत्याही काळी किंवा वेळी हरिनाम घेण्याने त्या दोन्ही गोष्टी पवित्र होतात, मंगल होतात. एक प्रकारे त्यांचा उध्दारच होतो. राम किंवा कृष्ण या नामामुळे सर्व प्रकारचे दोष म्हणजेच पापे नष्ट होतात. जड, अज्ञ तसेच ज्यांना विवेकशक्ती नाही अशा जीवांना परमेश्वरप्राप्ती कशी होईल? तर त्यांना तरून नेण्यास नाम हेच तारक आहे. हरिनाम घेणे म्हणजे जिभेच्या सर्व कामातील सारभूत काम आहे. या नामाला दुसरी कोणतीही उपमा लागू पडत नाही. ते सर्वात श्रेष्ठ आहे. अशा त्या देवाची पण स्तुती कोणी किती करावी ? ज्ञानदेव म्हणतात, "हरिनामाचा पाठ सांगोपांग झाला म्हणजेच तन-मन लावून एकाग्रतेने हरीचे नाम घेत राहिले तर स्वत:ला वैकुंठात गती नक्की मिळतेच. शिवाय मोक्षाचा म्हणजेच वैकुंठाचा मार्ग त्या भक्ताच्या पूर्व जांनाही सोपा होतो". या अभंगात ज्ञानेश्वरांनी हरिनामाचा सोपेपणा आणि त्याचे महान फल अशाप्रकारे वर्णन केले आहे.

**00000**

नित्यनेम नामी ते प्राणी दुर्लभ | लक्ष्मीवल्लभ तयांजवळी ||१||
नारायण हरि नारायण हरि | भक्ती - मुक्ती चारी घरीं त्याच्या ||२||
हरिविणें जन्म नर्कचि पैं जाणा | यमाचा पाहुणा प्राणी होय ||३||
ज्ञानदेव पुसे निवृत्तीसी चाड | गगनाहूनि वाड नाम आहे ||४||

विवरण : नामस्मरणाचे साधन सोपे आहे हे सर्वांना माहीत आहे पण लोक ते साधन सातत्याने करीत नाहीत. कधी कधी मधून मधून नामाचा जप करतील. मनात आलं तर कितीतरी मोठ्या संख्येने यथास्थित नामपाठ करतील. नाहीतर आळस आला म्हणजे कित्येक दिवस नामस्मरण करणार नाहीत. ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, जर खरोखर नित्यनेमाने नामजप केला तर साक्षात विष्णू त्यांच्याजवळ सतत उपस्थित राहील. जे नारायण हरि, नारायण हरि असे सतत मन एकाग्र करून म्हणतील त्यांच्याजवळ सर्व त-हेचे सुखोपभोग नित्य उपलब्ध असतील आणि घरबसल्या सर्व वैभव मिळेल. एवढेच नाही तर समीपता, सलोकता, सरूपता व सायुज्यता या चारी मुक्ती त्यांच्या घरी राबतील. या हरिनामाविना जर मनुष्य नेहमीचे जीवन जगत असेल तर ते नरकप्राय समजावे. तो मनुष्यप्राणी यमाचा पाहुणाच होईल म्हणजे त्याचा नरकवास नक्की ठरलेलाच आहे. ज्ञानदेवानी निवृत्तिनाथांना याचे रहस्य विचारले तेव्हा त्या गुरूनाथाने सांगितले की ज्ञानदेवा, नाम हे गगनापेक्षा विशाल आहे असे म्हणण्याचे कारण काय? कारण गगन किंवा आकाश हे एक जड असे महाभूत आहे. ते कितीका विशाल असेना. त्याच्या तुलनेत हरिनाम हे सर्व पंचमहाभूतात भरून राहिले आहे. शिवाय नाम हे भुक्ती - मुक्ती देणारे आहे. आकाश कुठे मुक्ती देते ? ते वैभव तरी कुठे देते ? व्यापकत्व हा एकच गुण त्या जड तत्त्वात आहे. पण नामात कितीतरी अधिक गुण आहेत, असा या चरणाचा लाक्षणिक अर्थ आहे. ज्ञानदेव हे ज्ञान आपल्याला निवृत्तिनाथांकडून मिळालं असं सांगतात त्यात त्यांची विलक्षण गुरूभक्ती व श्रध्दा दिसून येते.

00000

सात पाच तीन दशकांचा मेळा | एक तत्त्वीं कळा दावी हरि ||१||
तैसे नव्हे नाम सर्वत्र वरीष्ठ | तेथें काही कष्ट न लागती ||२||
अजपा जपणे उलट प्राणाचा | येथेंही मनाचा निर्धार असे ||३||
ज्ञानदेवा जिणें नामाविणे व्यर्थ | रामकृष्णीं पंथ क्रमियेला ||४||

विवरण : कोणी म्हणतात की सृष्टीत एकूण सात तत्त्वे आहेत. (पंचमहाभूते, प्रकृति, व पुरूष) कोणी म्हणतात पंच तत्त्वे मिळाली व त्यातून सृष्टी निर्माण झाली. कोणी जीव, जगत् व जगदीश अशी तीनच तत्त्वे मानतात. कोणी तीन गुणांचा (सत्त्व, रज, व तम) मेळा म्हणजे सृष्टी आहे असे म्हणतात. कोणी पंचमहाभूते, मन, चित्त व बुध्दी, अहंकार, जीवात्मा एवढी दहा तत्त्वे मानतात. सांख्य दर्शनात सात + पाच + तीन + दहा = पंचवीस तत्त्वांची सृष्टी मानलेली आहे. पण श्रीहरीच्या एकाच स्वरूपात ही सर्व सामावलेली आहेत असे तो (विराट स्वरूपात) दाखवितो. एवढी गणती करण्याची जरूरी नामस्मरणात लागत नाही. नामसाधना सर्व साधनात वरिष्ठ आहे. त्यासाठी कष्ट पडत नाहीत. श्वास घेताना 'सो' व श्वास सोडताना 'हम्' असा सूक्ष्म ध्वनी येतो त्यावर अनुसंधान करणे म्हणजे जप न करताही "सो हम्" असा जप घडणे. पण हे साधन करतानाही मन बाह्य विषयांकडे जाऊ न देता श्वासावर केंद्रित करण्याचा निर्धार करावा लागतो. ज्ञानदेव म्हणतात की नामाविना जगणेच व्यर्थ आहे! म्हणून भगवंताकडे जाण्याचा मार्ग म्हणजे 'राम कृष्ण' नामाचा जप हाच मार्ग मी स्वीकारला आहे. ह्या अभंगात ईश्वर प्राप्तीच्या अनेक साधनांचा परामर्श ज्ञानदेवानी घेतला आहे. त्यात त्या इतर साधनांचा अपमान करण्याची किंवा ती साधने त्याज्य ठरविण्याची त्यांची इच्छा नाही. पण त्या साधनातील मन एकाग्र करण्याची अडचण त्यांनी दाखवून दिली आहे. नामस्मरण करताना प्रथम मनाचा निर्धार करावा लागतोच. पण मग नाम आपल्या आपण प्रवाही स्वरूपात चारही वाणीत चालू राहते. नाम घेण्याची प्रक्रिया बदलते व नाम आपोआप येण्याची प्रक्रिया सुरू होते.

00000

# बुधवार - २४

जप तप कर्म क्रिया नेम धर्म | सर्वा घटीं रामभाव शुध्द ||१||
न सोडी हा भावो टाकीं रे संदेहो | रामकृष्णीं टाहो नित्य फोडी ||२||
जात वित्त गोत कुळशीळ मात | भजे का त्वरीत भावनायुक्त ||३||
ज्ञानदेवा ध्यानीं रामकृष्ण मनीं | तेणें वैकुंठभुवनीं घर केलें ||४||

**विवरण ः** सर्व साधने करताना व केली नाही तरीही एक दृढ भावना मनात ठेवावी की राम हाच सर्व पदार्थामध्ये, चर-अचर सृष्टीमध्ये भरलेला आहे. मग जप करा, तप करा, पूजा-विधी, यज्ञ, योगक्रिया, नियम, व्रतपालन, दानधर्म, यातील काहीही करा. "अरे भक्ता! तू संशय अजिबात सोडून दे. आपल्या मनातील भक्तिभाव मात्र सोडू नकोस. रामा! कृष्णा! अशी अत्यंत काकुळतीने तू देवाला हाक मार. आपली जात कोणती, आपण गरीब की श्रीमंत, आपले गोत्र काय आहे, आपले कुळ कोणते, आपले शील म्हणजे स्वभाव कसा आहे, या कोणत्याही गोष्टीचा तू विचार करू नको, शंका धरू नको. सच्ची भावना, खरी श्रध्दा ठेव आणि भगवंताची भक्ती कर. ज्ञानदेव म्हणतात माझ्या ध्यानी मनी रामकृष्णच आहेच त्यामुळे माझे घर वैकुंठलोकातच बांधलेले आहे. अर्थात बाह्यत: जरी मी या जगात वावरत आहे असे वाटले तरी जाणीवेने मी वैकुंठातच आहे. (येथे भगवंताचे भक्त किती वेगवेगळया सामाजिक स्तरातील असतात त्याचे स्मरण करण्यासारखे आहे. 'उच्चनीच काही नेणे भगवंत' असे एका अभंगात म्हटले आहे. रामदास, एकनाथ, हे विप्र, नामदेव-शिंपी, नरहरी-सोनार, सावता-माळी, गो-हा कुंभार, चोखोबा-अंत्यज, मीरा, सखू, कान्होपात्रा अशा स्त्रिया, मुक्ताई ही लहान मुलगी, ज्ञानदेवादी भावंडे ही वर्णबाह्य, गजेंद्र, मकर-प्राणी, गुहक- नावाडी, शबरी भिल्लीण, वाल्या कोळी तर भ्रष्ट ब्राह्मण, दरोडेखोर अशा प्रकारचे विविध स्तरावरचे भक्त असतात पण त्यांचाही उध्दारच होतो.)

येथे ज्ञानदेव आवर्जून नामस्मरणापासून सुरू होणारा भक्ति मार्ग इतर कोणत्याही घटकांची अपेक्षा ठेवत नाही, असे सांगतात. नाम घेण्यात कसलीच अडचण नाही हे सिध्द करण्याचा संत आटोकाट प्रयत्न करतात. ह्यात त्यांचा लोकांच्या उध्दाराविषयीचा कळवळा दिसून येतो.

00000

## गुरूवार - २५

**जाणीव नेणीव भगवंतीं नाहीं | हरि उच्चारणीं पाहीं मोक्ष सदा ||१||**

**नारायण हरी उच्चार नामाचा | तेणें कळिकाळाचा रीघ नाहीं ||२||**

**तेथील प्रमाण नेणवे वेदासी | ते जीवजंतूसी केंवि कळे ||३||**

**ज्ञानदेवा फळ नारायण पाठ | सर्वत्र वैकुंठ केलें असे ||४||**

**विवरण** - भगवंत हा ज्ञान-अज्ञान - विलक्षण असतो असा जो सिध्दांत आहे, त्याचा आणखी एक अर्थ ज्ञानदेवानी घेतला आहे व म्हटले आहे की आपले नाम घेणारा भक्त ज्ञान व विज्ञान यात निष्णात आहे का ते भगवंत पहात नाही. तो पंडित आहे की नाही तेही तो विचारात घेत नाही. तो साक्षर आहे की निरक्षर आहे याचा भेदभाव श्रीहरी भक्तीचा भाव पाहताना करीत नाही. जो नित्य अनन्य भक्ती करतो, नामातच मग्न राहातो, त्याला तो प्रभू आपला म्हणतो. भगवंताचे नाम नेहमी घेत राहिलं की मोक्ष आहेच! नारायण! हरी! असा नामाचा जप जेथे चालतो तेथे कलीचा अर्थात विकारांचा व काळाचा, अर्थात मृत्यूचा, -हासाचा, नाशाचा प्रवेश होऊ शकत नाही. आणि कोणत्या भावनेने मोक्ष मिळतो याचं काही निश्चित प्रमाण वेदांतही सापडत नाही. मग सामान्य जीवांना त्या हरीच्या कृपेचं रहस्य कसं कळणार? ज्ञानदेव म्हणतात - नारायण नामाचे पठण केल्याने सर्वोत्कृष्ट फळ मला मिळालं. ते म्हणजे मी आता सर्व जगभर वैकुंठच स्थापन केलं आहे. भक्त ध्रुव अरण्यात गेला आणि नारायण, नारायण या मंत्राचा त्याने निर्धाराने जप सुरू केला. विष्णूने त्याला प्रसन्न होऊन अढळपद दिले. भक्त प्रल्हादाने नारायण नामाचा जप केला. कोणत्याही प्रकारचे क्लेश त्याला दिले तरी त्याने आपले ध्येय सोडले नाही. तो घाबरला नाही. त्यावेळी त्याला डोंगरावरून खाली फेकलं, तापलेल्या तेलात टाकलं, आणि अग्नी पेटवून त्यात बसवलं तरी प्रत्येक वेळी नारायणाने त्याला वाचवलं. हिरण्यकश्यपु हा त्याचा बाप विष्णूचा द्वेष करीत असे. श्रीहरीने नृसिंह रूप धारण करून त्याचा वध केला. यावरून नामाचा प्रभाव केवढा असतो ते दिसून येतं. नाम घेताना संकटे येत नाहीत असे नाही. उलट नामस्मरण करणा-यांवर अनेक आपत्ति येतात. पण भगवंत भक्तांना वाचवतो हे निश्चित.

00000

एक तत्व नाम दृढ धरीं मना | हरीसी करूणा येईल तुझी ||१||

तें नाम सोपें रे रामकृष्ण गोविंद | वाचेशी सद्गद जपे आधी ||२||

नामां परतें तत्त्व नाहीं रे अन्यथा | वाया आणिक पंथा जाशी झणीं ||३||

ज्ञानदेवा नाम जपमाळ अंतरीं | धरोनी श्रीहरी जपे सदा ||४||

**विवरण -** ज्ञानदेव म्हणतात, अरे भक्ता ! सर्वात श्रेष्ठ असे तत्त्व म्हणजे हरीचे नाम. ते तू मनाशी दृढ धर. तेच खरे मोक्षाचे साधन आहे. ते जर तू दृढ भावनेने सतत घेत राहिलास तर तुझी करूणा हरीला येईल. तू या संसारात अनेक संकटांना तोंड देत आहेस. अनेक जन्मात तू अनेक हालअपेष्टा सहन केल्यास. दु:खातून सुटण्याचे तू अनेक उपाय केलेस. पण दुस-या कोणीही तुला सोडविले नाही. आता मी सांगतो. इतर सर्व साधने नामाएवढी प्रभावी नाहीत. राम काय, कृष्ण काय, हरी काय, वैखरीने ते नाम उच्चारणे सोपे आहे. मोठमोठी स्तोत्रे म्हणणे, वेद पाठ करणे, ते धडाधड म्हणणे, शास्त्रार्थ करीत बसणे, कर्मातील गुणदोष शोधत बसणे, या खटपटी कशाला हव्या आहेत? पण यांत्रिकपणे, संख्येकडे लक्ष ठेवून नुसते शुष्क, भक्तिशून्य अन्त:करणाने, तोंडाने नाम म्हणत राहणे हे पुरेसे नाही. कारण बाह्य कर्मापेक्षा त्या हरीला सद्भावना जास्त आवडते. भावना-भराने, प्रेमाने नाम घेताना कंठ दाटून येतो आहे, डोळयातून अश्रुधारा वहात आहेत, देवाच्या ध्यानाशिवाय चित्त दुसरे काहीच जाणत नाही अशी तुझी अवस्था झाली पाहिजे. म्हणजेच हरीचे मन द्रवेल. अरे भक्ता! खरंच सांगतो मोक्षाचे अन्य साधन नाहीच नाही. चुकून तू कोणाचा तरी उपदेश ऐकून यात्रा, यज्ञ, प्राणायाम, योग, दान, उपवास, कृच्छ्र, खडतर व्रते करायला जाशील तर फसशील. तसे काही करायला जाऊ नकोस. पुण्यकारक कर्मे मोक्ष देणारी नाहीत तर इहलोकात किंवा परलोकांत सुखभोग देणारी असतात. सुखाच्या लालसेने तू जर त्या मार्गाला गेलास तर मानव-जन्मास आलेल्याचे सर्व श्रेय फुकट जाईल. जो आपला संसारबंध तोडील अशा श्रीहरीचेच नाम घेत रहा. आणि जरी तू ते नाम प्रकट वैखरी वाणीने घेतले नाहीस तरी मनातल्या मनात श्रीहरी, श्रीहरी असे म्हणत रहा.

00000

## शनिवार - २७

सर्व सुख गोडी साही शास्त्रे निवडी | रिकामा अर्ध घडी राहू नको ||१||

लटिका व्यवहार सर्व हा संसार | वाया येरझार हरिविण ||२||

नाममंत्र जप कोटी जाईल पाप | रामकृर्ष्णी संकल्प धरूनी राहो ||३||

निजवृत्ती काढी सर्व माया तोडी | इंद्रिया सवडी लपू नको ||४||

तीर्थी व्रतीं भाव धरी रे करूणा | शांति दया पाहुणा हरी करी ||५||

ज्ञानदेवा प्रमाण निवृत्तिदेवी ज्ञान | समाधि संजीवन हरिपाठ ||६||

**विवरण -** ज्ञानदेव म्हणतात की 'सर्व शास्त्रांनी असा निवाडा केला आहे की सर्व सुखाची गोडी हरिनामातच आहे. तेव्हा हे भक्ता, नाम न घेता अर्धी घटकाही रिकामा राहू नको. कारण या संसारातील सर्व कर्मे व्यर्थ आहेत. नामस्मरण न केल्याने या संसारात पुन्हा पुन्हा जन्ममरणाच्या फे-या घालाव्या लागतात. जर तू नाममंत्र घेतलास तर कोटी कोटी पापे नष्ट होतील. तू श्रीरामाचे व कृष्णाचे नाम घेण्याचा पक्का निश्चय कर व नाम घेत रहा. तू सर्व मायेचे पाश तोड, इंद्रियांपासून दूर रहा. आपली वृत्ती त्यातून काढ. इंद्रियांच्या आवडीत, त्यांच्या विषयात तू स्वत:वर आवरण घालून घेऊ नकोस. तीर्थयात्रा कर, व्रतेही कर. पण त्यात हरिभक्तीचा भाव असू दे. दया असू दे. हृदयात श्रीहरीचा आदर-सत्कार कर - त्याचे अतिथीसारखे पूजन कर. निवृत्तिनाथ देवानी मला असे ज्ञान दिले आहे. हरिपाठातच समाधीचे संजीवन आहे. अर्थात् वाचन, मनन, श्रवण, पठण यांच्याद्वारे जागृतावस्थेतच समाधिसुख लाभते असे या हरिपाठाचे सामर्थ्य आहे. जरी नामस्मरण केले तरी इतर साधने कशी व्यर्थ आहेत त्याचा अभ्यास करायला हवा. सर्व साधनात हरिनाम श्रेष्ठ हे खरं. पण नित्य हरिनाम घेण्यासाठी मनाची भूमिका तयार व्हावी लागते. आणि सत्संगति, अतिथिपूजन, इंद्रियांच्या विषयांपासून मन हळु हळू निवृत्त करणे, तसेच हृदयात शांती, दया जोपासणे यासाठीसुध्दा व्रते, दाने, सदग्रंथांचे वाचन व मनन या गोष्टींचीही जरूरी असते. असा अर्थ ज्ञानेश्वरांनी या अभंगात स्पष्ट केला आहे.

**00000**

# रविवार - २८

अभंग हरिपाठ असती अठ्ठावीस | रचिले विश्वासें ज्ञानदेवें ||१||
नित्य पाठ करी इंद्रायणी तीरीं | होय अधिकारी सर्वथा तो ||२||
असावें एकाग्र स्वस्थ चित्त मन | उल्हासें करून स्मरण जीवीं ||३||
अंतकाळी तैसा संकटाचे वेळी | हरी त्या सांभाळी अंतर्बाह्य ||४||
संतसज्जनांनी घेतली प्रचीती | आळशी, मंदमती केवीं तरे ||५||
श्रीगुरू निवृत्ती वचन प्रेमळ | तोषला तत्काळ ज्ञानदेव ||६||

**विवरण** - याप्रकारे अठ्ठावीस अभंगांचा हा हरिपाठ आहे. निवृत्तिनाथानी दिलेल्या वचनावर श्रध्दा ठेवून ज्ञानदेव संतुष्ट झाले आणि भवसागर तरून गेले. जो इंद्रायणीतीरी बसून याचा नित्य पाठ म्हणतो तो सर्वथा मोक्षाचा अधिकारी होतो. चित्त स्वस्थ असावे, हरिचरणी मन एकाग्र करावं, उत्साहाने, आनंदाने, जीवाभावाने नामस्मरण करावं. असं जे करतील त्यांना संकटाच्या वेळी हरी सांभाळतो. देहांताच्या वेळी स्वत:जवळच घेतो. त्यांची बाह्यत: व अंतरंगातली भक्ती कायम ठेवून त्यांचे रक्षण करतो. संतांनी व सज्जनांनी याची प्रचिती घेतली आहे. जो मंदबुध्दीचा आहे आणि या बाबतीत आळस करतो, तो कसा बरं तरून जाईल? श्रीनिवृत्तिनाथांनी, माझ्या गुरूंनी जे प्रेमळपणे मला वचन दिलं त्याने मला अत्यंत समाधान झालं, असं ज्ञानदेव म्हणतात.

या २८व्या अध्यायात ज्ञानदेवानी हरिपाठाने संसार तरून जाता येतो, हरिनामच घेत रहावं, हरिपाठ नित्य इंद्रायणीच्या तीरी म्हणावा असं म्हटलं आहे व संतसज्जनांनी याची प्रचिती घेतली आहे असंही सांगितलं आहे. निवृत्तिनाथांवरील त्यांची भक्ती, कशी दृढ होती तेही या अभंगात दिसून येते. या अभंगात ज्ञानदेवांच्या हरिपाठाची फलश्रुती दिली आहे. इंद्रायणीच्या तीरी याचा आणखी एक अर्थ असा निघतो की पवित्र क्षेत्रस्थानी या अभंगांचे नुसते पठणच नव्हे तर त्यावर मननही करावं. पुढे म्हटलं आहे एकाग्री असावं, अर्थात् एकांत असावा असाही आध्यात्मिक अर्थ आपण लक्षात घेतला पाहिजे. या हरिपाठामध्ये नुसत्या नामस्मरणाचे महत्त्व सांगितलेले नसून इतर अभ्यासही करावा असं आधीच्या अभंगात (२७व्या) म्हटलं आहे. तिकडे लक्ष देणं जरूर आहे.

**00000**

## सोमवार - २९

कोणाचें हें घर हा देह कोणाचा | आत्माराम त्याचा तोचि जाणे ||१||
मी तू हा विचार विवेकें शोधावा | गोविंदा माधवा याच देहीं ||२||
देही ध्याता ध्यान त्रिपुटीवेगळा | सहस्त्रदळी उगवला सूर्य जैसा ||३||
ज्ञानदेव म्हणे नयनांची ज्योती | या नावे रूपे ती तुम्ही जाणा ||४||

विवरण - साधकाने नित्य असा शोध घ्यावा की आपला देह म्हणजे कोणाचे राहावयाचे घर आहे ? मग कळेल की, आत्म्याचेच हे घर आहे व हे जाणणाराही तोच आहे. त्याने मी कोण व मी ज्याला 'तू' म्हणतो तो 'तू' कोण आहे याचाही, याच देहात, गोविंद, माधव आदि नामानी जाणला जाणारा आत्मा आहे हे लक्षात घेऊन विचार करावा. देहातच असे ध्यान करता करता, ध्याता, ध्यान व ध्येय या तीन घटकावेगळा तो आहे व मस्तकात सहस्त्रदल कमळात तो सूर्यासारखा स्वयंप्रकाशी तळपत आहे, हे जाणवेल. ज्ञानदेव म्हणतात, नेत्र ज्या आंतरिक तेजाने ज्योतीस्वरूप आत्मरूपाच्याच आधारावर बाहेरचे विश्व पाहतात तो आत्मा गोविंद, माधव यांच्या नामानी व रूपाने जाण. या अभंगात नामस्मरणाबरोबरच कुंडलिनी योगाचाही परामर्श ज्ञानदेवानी घेतलेला आहे. साधन-चतुष्टय हे परमार्थासाठी आवश्यक आहे. त्यातील विवेक हे पहिले साधन. येथे त्या विवेकाचा उल्लेख करून आपल्या अनित्य देहामध्ये नित्य असा जो आत्मा आहे तिकडे लक्ष देण्यास सांगितले आहे. उपनिषदात म्हटले आहे की, 'आत्मा वा अरे द्रष्टव्य: (आत्माच पहावा) म्हणजेच अनेकात एकत्व पहावे. द्वैतात अद्वैत पहावे, आत्मा म्हणजे काय नाही त्या वस्तूंना बाजूस सारावं, देह हा नाशिवंत आहे पण जो आत्मा या देहाला धारण करतो तो, मी व तू अशा दोन घटकांनी ओळखला जात नसून जो द्रष्टा आहे तोच दृष्य होतो आणि पहाणेपण तोच होतो त्यावेळी मस्तकामध्ये असणा-या सूक्ष्म अशा सहस्त्रदल कमलाकृती, उच्च अशा कुंडलिनीच्या शिवस्थानात अर्थात् कमळात सूर्य उगवल्याप्रमाणे महान तेज प्रकट होते. ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायात या कुंडलिनी योगाबद्दल ज्ञानेश्वरानी माहिती दिली आहे. ती वाचावी म्हणजे नाम हे सोपे साधन करता करता आपोआप कुंडलिनी योगमार्गाचा अभ्यास कसा होतो ते लक्षात येईल. त्या आत्म्याला, नामस्मरणच्या मार्गाने जाताना भगवंताच्या गोविंद, माधव, हरि इत्यादी नावांनी संबोधले जाते.

00000

नामसंकीर्तन साधन पै सोपे | जळतील पापें जन्मांतरींची ||१||
न लगती सायास जावे वनांन्तरा | सुखें येतो घरा नारायण ||२||
ठायीच बैसोनी करा एकचित्त | आवडी अनंत आळवावा ||३||
रामकृष्ण हरि विठ्ठला केशवा | मंत्र हा जपावा सर्वकाळ ||४||
यावीण असतां आणिक साधन | वाहातसे आण विठोबाची ||५||
तुका म्हणे सोपें आहे सर्वाहूनि | शहाणा तो धणी घेतो येथें ||६||

**विवरण** - तुकारामांचा हा अभंग नामस्मरणाबद्दलच आहे आणि ज्या भक्तीमंदिराचा पाया ज्ञानदेवानी रचला त्याचा कळस असा जो तुकाराम, महान विठ्ठलभक्त त्याचा हा अभंग आहे म्हणून ज्ञानदेवांच्या हरिपाठात त्याला स्थान दिले आहे. महाराज म्हणतात - सर्व साधनात हरिनामाचे गुणगान करणे, हरीची कीर्ती लोकांना सांगणे हे सोपे साधन आहे. त्यानेच अनेक जन्मातील साधकाची पापे नष्ट होतील. त्यासाठी अरण्यात जाऊन कोणतेही खडतर तप करावे लागत नाही. भगवान साधकाच्या घरी सहजच येतो व निवास करतो, अर्थात् समीपता मुक्ती मिळते. त्यासाठी आपल्या घरी निवांतपणे आसनावर स्वस्थ बसून चित्त एकाग्र करावं आणि राम, कृष्ण, हरि, विठ्ठल, केशव, अनंत, असं प्रेमाने नाम घ्यावं व आर्ततेने भगवंताला आवाहन करावं. त्यामुळे मोक्ष सहज शक्य आहे. म्हणून नामाचा जप सर्वकाळ करावा. कोणत्याही वेळी, कुठेही असाल त्या परिस्थितीत जप करावा. महाराज म्हणतात, मी विठ्ठलाची शपथ घेऊन सांगतो की हेच सर्वात सोपे असे मोक्षाचे साधन आहे व भगवत् प्राप्तीचेही. दुसरं कोणतंही साधन इतकं सोपं नाही. जो शहाणा असेल, सूज्ञ असेल तो या साधनाचा फायदा घेईल व परमार्थ साधना पूर्ण करील. (इतर साधनात कष्ट असतात, यज्ञ व इतर कर्मात शुध्द, अशुध्दतेचा विचार करावा लागतो. चूक झाल्यास अकल्याण होते. संसारातील आश्रमधर्माची कर्मे करतानाही मन सतत मोहग्रस्त होते. विकार बळावतात. दान देताना पात्र व अपात्र, योग्य व अयोग्य याचा विचार करावा लागतो. सर्व साधनांना त्रिगुणांची उपाधी असते. पण नाम हे गुणातीतच असते.)

00000

# पसायदान

आता विश्वात्मकें देवे । येणें वाग्यज्ञें तोषावें ।
तोषोनि मज द्यावें । पसायदान हें ।। १ ।।

जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मीं रति वाढो ।
भूतां परस्परें पडो । मैत्र जीवाचें ।। २ ।।

दुरिताचे तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्यें पाहो ।
जो जें वांछील तो तें लाहो । प्राणिजात ।। ३ ।।

वर्षत सकळमंगळीं । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूमंडळीं । भेटतु भूतां ।। ४ ।।

चलां कल्पतरूंचे आरव । चेतना चिंतामणीचे गांव ।
बोलते जे अर्णव । पीयूषाचे ।। ५ ।।

चंद्रमें जे अलांछन । मार्तंड जे तापहीन ।
ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ।। ६ ।।

किंबाहुना सर्वसुखीं । पूर्ण होऊनी तिहीं लोकीं ।
भजिजो आदिपुरूखीं । अखंडित ।। ७ ।।

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं इयें ।
दृष्टादृष्ट विजयें । होआवें जी ।। ८ ।।

येथ म्हणे श्रीविश्वेशरावो । हा होईल दानपसावो ।
येणें वरें ज्ञानदेवो । सुखिया झाला ।। ९ ।।